दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ६३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२७ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीला नाना पटोले यांचे आश्वासन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**लोकनेते दि. बा. पाटील हे महाराष्ट्राचे मोठे नेते होते. ओबीसी समाजासाठी त्यांनी केलेले काम अतुलनीय असेच आहे. आमच्या पिढीचे ते आदर्श होते. त्यामुळे त्यांचे नाव नवी मुंबईतील विमानतळाला देण्यासंदर्भात मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून आपल्या सर्वपक्षीय कृती समितीची त्यांच्याशी भेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करेन, असे आश्वासन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आज लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीला दिले.**



नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी जनता सुरुवातीपासून करीत आहे. त्याबाबतचा पत्रव्यवहार राज्य व केंद्र सरकारकडे करण्यात आला आहे. यासाठी रायगड, नवी मुंबई, ठाणे, पालघर यांसह अनेक जिल्ह्यांत मोठी चळवळ उभी राहात आहे. त्यासाठी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या एका शिष्टमंडळाने आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेऊन त्यांना या संदर्भातले एक निवेदन देऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यावेळी पटोले यांनी या शिष्टमंडळाला आश्वासित केले.

कृती समितीचे अध्यक्ष, शेतकरी नेते दश–रथदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भेटलेल्या या शिष्टमंडळात कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, कार्यकारिणी सदस्य उद्योजक जे. एम. म्हात्रे, ओबीसी नेते जे. डी. तांडेल, कृती समितीचे सहचिटणीस दीपक म्हात्रे, संतोष केणे, मेघनाथ म्हात्रे आणि जासई ग्रामस्थांचे प्रतिनिधी आदींचा समावेश होता. या शिष्टमंडळाने नाना पटोले यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकनेते दि. बा. पाटील यांची नवी मुंबई, रायगड ही कर्मभूमी आहे. इथल्या भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले सबंध आयुष्य वेचले आहे. १९८४ साली शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य भाव मिळावा, यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या व साऱ्या देशभर गाजलेल्या शौर्यशाली लढ्यातील शेतकऱ्यांना साडेबारा टक्के विकसित जमीन देण्याचे तत्त्व प्रस्थापित झाले. पुढे ते महाराष्ट्रातील सर्व प्रकल्पग्रस्तांना लागू झाले. दि. बा. पाटील यांनी महाराष्ट्रातील ओबीसी समाजासाठी भरपूर काम केले आहे. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी व त्यानंतरही ओबीसी समाजात जागृती निर्माण करण्यासाठी दि. बा. पाटील यांनी महाराष्ट्रभर दौरे केले. अशा या लोकोत्तर नेत्याचे नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव देणेच योग्य आहे.

# पालकमंत्री आदिती तटकरेंनी दिल्या बालरुग्णालयांना भेटी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आज पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी पनवेल शहरातील डॉ.भांडारकर रुग्णालय, डॉ.नाडकर्णी रुग्णालय, डॉ.बिरमुळे रुग्णालयांना भेटी देऊन तेथील डॉक्टरांशी संवाद साधला. यावेळी आयुक्त सुधाकर देशमुख, उपविभागीय अधिकारी दत्तात्रय नवले, उपायुक्त संजय शिंदे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, तहसिलदार विजय तळेकर, डॉ भोईटे, डॉ.पंडित, डॉ. जाधव उपस्थित होते.

तिसऱ्या लाटेमध्ये लहान मुलांना फारसा धोका उद्भवण्याची शक्यता नसली तरी देखील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आराखडा आखणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी बालरोग तज्ञ डॉ.भांडारकर, डॉ.नाडकर्णी , डॉ.बिरमुळे यांच्याशी आगामी नियोजनाच्या दृष्टीने चर्चा केली. लहान मुलांमध्ये आढळून येणारी लक्षाणे, कमी–अधिक स्वरुपाच्या लक्षणानुसार लहान मुलांवर करण्यात येणाऱ्या उपचाराविषयी त्यांनी माहिती घेतली. प्रतिबंधात्मक उपाययोजना करताना पुरेसे ऑक्सीजन बेड्स, आयसीयू बेडस्, पिडियाड्रिक व्हेंटिलेटर्स उपलब्धतेविषयी यावेळी चर्चा करण्यात आली. त्यानुसार व्यवस्था करण्याविषयीच्या सूचना पनवेल महानगरपालिका प्रशासनाला देण्यात आल्या. नव्याने होणाऱ्या कळंबोली येथील प्रस्तावित जंबो कोविड सेंटर येथे तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांसाठी ५० आयसीयूबेडस्, १०० ऑक्सीजन बेडस् , एमजीएम रुग्णालयात २० बेडस्, उपजिल्हा रुग्णालयात २० बेडस् राखीव ठेवण्यात येणार आहे. याठिकाणी लहान मुलांसाठी गरजेनुसार वैद्यकिय सोयीसुविधा उपलब्ध करण्याविषयी यावेळी चर्चा करण्यात आली. या तीनही बालरोगतज्ज्ञांशी चर्चा केल्यानंतर पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी प्रशासनाला निर्देश दिले आहेत की, कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांना असलेला धोका लक्षात घेऊन तातडीने आवश्यक त्या उपाययोजना राबवाव्यात. जिल्ह्यातील बालरोगतज्ज्ञांना शासनाकडून जे जे सहकार्य अपेक्षित आहे, ते संपूर्ण सहकार्य निश्चित मिळेल.



## संक्षिप्त...

### राज्यात केशरी शिधा पत्रिकाधारकांसाठी छगन भुजबळ यांची मोठी घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

करोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसंच या संकटकाळात राज्य सरकारने अन्न–धान्य मोफत वाटण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. अशातच राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे.

यावेळी माहिती देताना छगन भुजबळ म्हणाले की, राज्यात प्रधानमंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत अन्नधान्यांचे राज्यात मोफत वितरण चालू आहे. त्याचबरोबर आता एपीएल केशरी शिधापत्रिकाधारकांनाही जून महिन्यात प्रतिव्यक्ती १ किलो गहू व १ किलो तांदूळ याप्रमाणे २ किलो अन्नधान्य सवलतीच्या दरात वाटप करण्याचा महत्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयाचा राज्यातील ७१ लाख ५४ हजार ७३८ एपीएल केशरी शिधापत्रिकाधारकांना लाभ होणार असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, लॉकडाऊन काळात गरगरीब नागरिकांचे हाल होऊ नयेत यासाठी राज्य सरकारने आर्थिक पॅकेजही जाहीर केले होते. या पॅकेजनुसार रिक्षा चालकांसह इतर काही घटकांना थेट आर्थिक मदत देण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९८२०३५५३४६**

# अवैध मद्याची वाहतूक करणाऱ्यांविरूद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाचा बडगा

## ६७ लाख रूपये किंमतीचे विदेशी मद्याचे ६२५ खोके ट्रकसह जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोवा राज्यात निर्मिती व विक्रीसाठी असलेल्या भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याचे ६२५ खोके राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पकडले असून या मद्यासह ते वाहून नेणारा ट्रक असे एकूण ६७ लाख ५७ हजार रूपयांचा मुद्देमाल या पथकाने जप्त केला आहे. या प्रकरणी एकास अटक करण्यात आली आहे. सायन–पनवेल मार्गावर खारघर उड्डाण पूलाखाली ही कारवाई करण्यात आली.

देशी–विदेशी मद्याची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्यांविरूद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाने कठोर कारवाईचा बडगा उगारला असून राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कांतीलाल उमाप यांच्या आदेशान–ुसार तसेच अंमलबजावणी व दक्षता संचालक श्रीमती उषा वर्मा, कोकण विभागाचे उपायुक्त सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईच्या महाराष्ट्र राज्य भरारी पथकाने ही कारवाई केली. या पथकाची गोवा राज्यातील अवैध मद्य विरुद्ध या महिन्यातील तिसरी मोठी कारवाई आहे. सायन–पनवेल मार्गावर खारघर उड्डाण पूलाखालून अवैधरित्या विदेशी मद्याची वाहतूक होणार ..../२



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवार दिनांक २७ मे रोजी तालुक्यातील भेरले, शेडुंग, भिंगारवाडी, न्हावा खाडी, शिवाजीनगर, न्हावा, मालडुंगे, खैरवाडी, बॉडारपाडा, फणसवाडी, गारमाळ, कोंडले, नांदगाव, भंगारपाडा आदी गा–वातील गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७० वा वाढदिवस आहे. वैश्विक महामारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रमाला सोमवारपासून प्रारंभ झाले.भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या सुयोग्य नियोजनातून तालुक्यातील गावागावांमध्ये गरजूंना अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांना भूमिपुत्रांना न्याय हक्क मिळवून देणारे दि.बा. पाटील यांचेच नाव विमानतळाला दिले पाहिजे : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई विमानतळाला नाव कोणाचे, दि.बा.पाटीलांचे? की हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे? हा वाद सध्या चिघळतोय. माजी खासदार लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव विमानतळाला द्यायचे असा चंग बांधून सर्वपक्षीय कृती समिती आंदोलन पेटवत आहे. १० जून रोजी



मानवी साखळी निर्माण करून राज्य शास–नाला झोपेतून जाग करण्यासाठी एल्गार केला जाणार आहे. सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही तर २४ जून रोजी सिडकोच्या मुख्यालयाला घेराव घालण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आमच्या प्रतिनिधीने पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याशी चर्चा केली असता नवी मुंबई विमानतळाला माजी खासदार लोकनेते दि बा पाटील यांचेच नाव दिले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली.

ते म्हणाले की नवी मुंबई क्षेत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा विमानतळ उभारण्याची प्रक्रिया तशी दशकभरापूर्वी सुरू झाली, प्रत्यक्ष भूसंपादन सहा वर्षांपूर्वी सुरू झाले. तेव्हापासून प्रत्येकाच्या मनामध्ये या विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचेच नाव दिले जावे अशी भावना होती. अबालवृद्धांपासून प्रत्येकाला तसे वाटत होते. आमचा सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाला विरोध नाही. किंबहुना आज जर ते हयात असते तर त्यांनी देखील नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील यांचेच नाव दिले पाहिजे अशी भूमिका ..../२

मला संघर्षाचे बाळकडू आमच्या घरातूनच मिळाले आहे. जासईच्या लढ्यामध्ये माझे वडील जे.एम.म्हात्रे यांनी आंदोलनात आघाडीवर राहून पोलिसांच्या लाठ्या अंगावर झेलल्या आहेत. त्याचे व्रण आजही त्यांच्या पाठीवर दिसून येतात. त्यांनी आम्हाला हे व्रण स्वतःहून दाखवले आहेत. पाठीवरील ते व्रण बघितल्यानंतर आमचा उर अभिमानाने भरून येतो. दि.बा.पाटील साहेबांच्या सोबत कित्येक आंदोलनात त्यांनी साथ दिलेली आहे. त्यांच्या शिकवणीनुसार आणि पक्षाच्या विचारधारे नुसार आम्ही आज कार्य करत आहोत.

**: प्रितम म्हात्रे,**
**विरोधी पक्षनेते, पमपा**

## ‘आरोग्य सोयीसुविधा संपन्न रायगड’ करण्यासाठी पालकमंत्री नात्याने सर्व स्तरांवर प्रयत्नशील

# उपजिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन, अत्याधुनिक ट्रॉमा केअर युनिट, स्त्री व नवजात बालकांच्या विशेष रुग्णालयासाठी आरोग्यमंत्री राजेश टोपे सकारात्मक : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुंबईलगत असलेल्या रायगड जिल्ह्यात औद्योगिक विकास झपाट्याने होत आहे. परिणामी, येथील लोकसंख्येत लक्षणीय वाढ होत असताना, येथील आरोग्यविषयक वैद्यकीय सोयीसुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. करोना संकटामुळे आरोग्य यंत्रणेवर विशेष भर देताना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे अत्याधुनिक आरोग्य सोयीसुविधा व रुग्णालयांची क्षमता वाढविण्यासाठी मी नात्याने सर्वोतोपरी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी नुकतेच केले आहे.



राज्याचे आरोग्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्याशी मंत्रालयात काल (दि.२५ मे) रोजी झालेल्या भेटीबाबत माहिती देताना त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या, रोहा व महाड तालुक्यात १०० रुग्णक्षमतेच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन करणे, भुवनेश्वर ता.रोहा येथे १०० खाटांचे स्त्री व नवजात बाल रुग्णालयस्थापन करणे व माणगाव येथे लेवल–३ ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करण्यासाठी आरोग्य विभागाकडून सकारात्मक कार्यवाही केली जाणार आहे.

पालकमंत्री कु. तटकरे यांनी पुढे सांगितले की, कोकण रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग या वाहतुकीच्या सुविधा तसेच औद्योगिकीकरणामुळे रोहा येथील उपजिल्हा रुग्णालयावरील वाढता ताण पहाता, येथे १०० ..../२

# ज्येष्ठ नागरिकाला लुबाडणाऱ्या त्रिकुटास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करून लुबाडणाऱ्या तीन अनोळ–खी इसमांना गजाआड करण्यास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाला यश आले आहे.

खांदेशवर पोलीस ठाणे हद्दीत तीन अनोळखी इसमानी ८५वर्ष वयाचे ज्येष्ठ नागरिक असलेल्या फिर्यादी यांच्या दुकानांमध्ये घुसून त्यांना लोखंडी पाईपने मारहाण करून जबरी चोरी केल्याने सदर बाबत खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र ११५/२१ कलम ३९४,४५२,३४ भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरच्या संवेदनशील गुन्हा उघडकीस आणण्याबाबत गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वपोनि गिरीधर गोरे व त्यांचे पथक सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व बातमीदार यांच्या मदतीने सदर गुन्हयातील तिन्ही आरोपी निष्पन्न केले. पो.ह. सुनील कुदळे यांना मिळालेल्या बातमी अन्वये गुन्हयातील वापरेलली ऑटो रिक्षा हस्तगत करण्यात आली. त्याच दरम्यान गुन्ह्यातील तिन्ही आरोपी हे गुन्हा केल्यानंतर राज्य–उत्तर प्रदेश येथे पळून गेले असल्याचे निष्पन झाले. त्यांचे मोबाईल नंबर प्राप्त करून त्याचे लोकेशन व मुंबई मधून त्याचवेळी उ.प्र. ला जाणाऱ्या ट्रेन चे लोकेशन तपासले असता ते दोन ..../२

# शिस्तीचा बेशिस्त बडगा

शिस्त पाळण्याची, घटनाद्रोही मजकूर प्रसारित न करण्याची आणि प्रसारित होणाऱ्या प्रत्येक मजकुराची नैतिक व कायदेशीर जबाबदारी स्वीकारण्याची केंद्र सरकारने घातलेली तीन महिन्यांची मुदत ज्या दिवशी संपते; त्याच दिवशी दिल्ली आणि गुरुग्राममधील ट्विटर या मायक्रोब्लॉगिंग साइटच्या कार्यालयांवर दिल्ली पोलिसांनी छापे टाकावेत, हा काही योगायोग नाही. दोन केंद्रीय मंत्र्यांनी तीन महिन्यांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन ट्विटर, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामसहित सर्व समाज माध्यमांना आपण कोणती बंधने पाळणार आहोत, याचे प्रतिज्ञापत्र केंद्र सरकारला सादर करण्यास सांगितले होते. ती मुदत संपली आहे. या बलाढ्य कंपन्यांनी सरकारला अशी पत्रे दिली आहेत का, हे अजून तरी स्पष्ट झालेले नाही. या सर्व माध्यमांना कोट्यवधी भारतीयांनी उदार आश्रय दिला आहे. त्यात भारतातल्या ९५ टक्क्यांपेक्षा जास्त तरुणांचाही समावेश आहे; त्यामुळे मुदत उलटली असली, तरी केंद्र सरकार शेजारच्या हुकूमशाहीतल्या चीनसारखे सगळ्या माध्यमांना टाळे ठोकणार नाही, हे तर उघड आहे. सरकारचे या माध्यमांकडे लक्ष आहे, याची कठोर जाणीव देण्यासाठी केंद्र सरकारच्या अखत्यारित असणाऱ्या दिल्ली पोलिसांनी ट्विटरच्या कार्यालयात धडक मारली आहे. या धडकेमुळे ट्विटरचे अमेरिकेतील मुख्यालयही खडबडून जागे झाले आहे. पुढच्या काही दिवसांमध्ये केंद्र सरकार आणि ही समाज माध्यमे यांच्यातील संघर्ष वाढत गेला, तर आश्चर्य वाटायला नको. तशी लक्षणे दिसत आहेत. भारतीय जनता पक्षाने देशातील मुख्य मध्यवर्ती माध्यमांना नावे ठेवत आपला सारा प्रचार समाज माध्यमांच्या मार्फत घरोघरी पोहोचविला, तेव्हा ही माध्यमे गोड वाटत असावीत. आता सात वर्षांच्या कारभारात या माध्यमांचे इतरही गुण दिसायला लागले आणि ती टोचू लागली. अर्थात, समाज माध्यमे आणि केंद्र सरकार यांच्या संघर्षात सरकारचीच बाजू चुकीची आहे, असे नाही. ही माध्यमे आणि त्यांचे नियंते खोडसाळपणे वागतातच. त्यांना भारतीय समाजाची वीण, इथली सामाजिक शांतता, असत्याचा माध्यमांमधून होणारा अपप्रचार किंवा जागतिक शक्तींकडून भारताचा शक्तिपात करण्यासाठी होणारी कारस्थाने यांच्याशी काहीही देणेघेणे नाही. त्यांना फक्त नफा दिसतो किंवा कधी कधी त्यापलीकडचे भारताचे नुकसानही; त्यामुळे दिल्ली पोलिसांनी ट्विटरवर छापा टाकला, म्हणजे देशातील सारे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आता संकटात आले, असे समजता येणार नाही. यातल्या एका महत्त्वाच्या उपकथानकाकडे लक्ष वेधायला हवे. भाजपचे प्रवक्ते डॉ. संबित पात्रा यांनी ट्विट करून काँग्रेसचे तथाकथित टूलकिट प्रसिद्ध केले. या टूलकिट म्हणजे कार्यक्रम पत्रिकेत, समाज माध्यमे वापरून केंद्र सरकारला कसे उघडे पाडायचे किंवा त्याच्या विरोधात आवाज उठवत राहायचे, याच्याबद्दलचा मजकूर होता. या ट्विटनंतर अनेक घडामोडी वेगाने घडल्या. काँग्रेसने हे टूलकिटच बनावट असल्याचे म्हटले. दिल्ली पोलिसांनी या ट्विटचा हवाला देऊन काँग्रेस पक्षाला एक नोटीस पाठविली. या वादात तेल पडले ते, ट्विटरने संबित पात्रा यांच्या ट्वीटवर 'मॅन्युप्युलेटेड' असा टॅग लावल्यामुळे. संबित पात्रा थापेबाजी करीत आहेत, असे थोडक्यात ट्विटरने म्हटले आहे. मुख्य म्हणजे, भाजपने मागणी करूनही हा टॅग काढायला ट्विटरने नकार दिला. ही संघर्षाची नवी ठिणगी होती. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष असताना ट्विटर त्यांच्या खात्यावरील कमेंट, माहिती किंवा विधानांना अनेकदा सरळ 'मॅन्युप्युलेटेड' असा शिक्का मारत असे. हे खाते आणि ते चालविणारी व्यक्ती विश्वासार्ह नाही, असा पवित्रा यामागे असे. पुढे ट्विटरने ट्रम्प यांचे खाते कायमचे बंद केले. हा इतिहास लक्षात घेता, पात्रा यांच्यावरील कारवाईने भाजप बिथरला आणि त्याने संबंधित खात्यांना कामाला लावले, असे दिसते. हा सारा संघर्ष कुठे जाणार आणि त्यात कोण जिंकणार, याच्या उत्तरापेक्षाही भारतातील सर्वच माध्यमे जबाबदारीने कशी वागतील; तसेच आधीच अशांत असणाऱ्या भारताच्या भूमीवर नवनवे संघर्ष कसे पेटवणार नाहीत, हे प्रश्न अधिक मोलाचे आहेत. ही माध्यमे भारतविरोधी कशी आहेत, हे सिद्ध करण्यासाठी अनेक उदाहरणे दिली जातात. कॅपिटॉल हिलवर जमलेला जमाव यांना अमेरिकेच्या स्थैर्यास बाधा आणणारा वाटतो; पण दिल्लीत लाल किल्ल्यावर हल्ला चढविणारे आंदोलक समर्थनीय वाटतात, हा व असे आक्षेप या माध्यमांवर घेतले गेले आहेत. त्यात तथ्य आहे; मात्र सरकारने अचानक हातात जो चाबूक घेतला आहे, तसे त्यांचे नियंत्रण साधणार नाही. भारताच्या समाज जीवनात त्यांनी खोलवर मुसंडी मारली आहे. अशा वेळी, सर्व समाज माध्यमांसाठी कायद्याच्या चौकटीत उत्तम आचारसंहिता तयार करणे, तिची जबाबदारी निष्पक्ष आणि निस्पृह यंत्रणेकडे कायमची सोपविणे, हा खरा मार्ग आहे. 'आमच्या प्रवक्त्याला खोटे पाडता, तर तुमच्या कार्यालयातच ठाण मांडू' असले कोते खेळ करून नाट्य निर्माण होते. समस्या सुटतातच असे नाही.

# शिरढोणजवळ टायर गोडाऊनला लागली आग ; आगीच्या घटनांमध्ये वाढ

## प्रगती एम्पोरियम कंपनीमधील उघड्यावर साठवणूक केलेल्या टायरच्या गोदामाला आग



**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई गोवा महामार्गावरील त्रिमूर्ती हॉटेलच्या बाजूला असणाऱ्या प्रगती एम्पोरियम कंपनीमध्ये उघड्यावर टायरचा साठा करून ठेवलेला असताना, अचानक आग लागली. गेल्या काही वर्षांमध्ये कंपन्यांमध्ये तसेच कंपन्यांच्या बाहेरील भागात गोदामाला आग लागण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. बुधवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास सदर आग लागली असताना सिडको अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. यावेळी अग्निशामक दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले.

प्रगती एम्पोरियम ही कंपनी कर्नाळा अभयारण्याला लागूनच असल्यामुळे आणि असले आगीचे प्रकार रात्री अपरात्री घडल्यास या भागातील जंगल परिसरात वणवा पसरण्यास वेळ लागणार नाही. पनवेलमधून निघाल्यानंतर रायगड जिल्ह्याचे मनाचे स्थान म्हणून कर्नाळा अभयारण्याकडे पहिले जाते. याठिकाणी विविध प्रकारचे प्राणी, पक्षी बागडत असतात. मात्र अशा बेजबाबदार कृतींमुळे येथील जनजीवन धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शिरढोणपासून जवळच असणाऱ्या या प्रगती एम्पोरियम कंपनीमध्ये लागलेल्या आगीची घटना यापूर्वीही घडल्याचे समोर आले आहे. बुधवारी याठिकाणी आग लागल्यानंतर नवीन पनवेल येथील सिडकोचे लिडिंग फायरमन एस.एम.पडयाळ, ड्राइवर आर.एस.फरांदे, अग्निशामक जे.के.पाटील, जि.पी.गडगे, एच.के. म्हात्रे, वाय.टी.शिंदे, भूषण पाटील आदींचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

यावेळी तब्बल दीड तासांच्या अथक प्रयत्नांनंतर टायरला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविण्यात सिडकोच्या जवानांना यश मिळाले.

# भात खरेदी विक्री करत असताना शंभर टक्के मोबदला पैसे खात्यावर जमा

**दै.रायगड नगरी । पनवेल**



शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ निष्ठावंत नेते, पनवेल तालुका सहकारी भातगिरणीचे चेअरमन एम सी पाटील यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांना भरपूर प्रमाणात भात खरेदी विक्री करत असताना शंभर टक्के मोबदला पैसे खात्यावर जमा करण्यात एम सी पाटील व संचालक मंडळाला यश आले आहे. याबद्दल पनवेल तालुका सहकारी भातगिरणीचे नाव रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर घेऊन जाण्यात त्यांना यश लाभले आहे.आणि भविष्याच्या काळात पनवेलची भातगिरणी आपल्या महाराष्ट्रात नंबर वन ला आणण्यासाठी भातगिरणीचे सभापती एम सी पाटील, उपसभापती राजेंद्र घरत व सचिव संदीप केणी यांच्या नेतृत्वाखाली सर्व संचालक मंडळाच्या वतीने सर्व शेतकऱ्यांना शंभर टक्के पेमेंट करुन त्यांचा भात खरेदी करून शासनाच्या कार्यालयात पाठवण्याची मानसिकता पनवेल तालुका सहकारी भातगिरणीचे चेअरमन एम सी पाटील यांनी तशी बोलताना माहिती दिली.

आतापर्यंत पनवेल तालुक्यातील सहकारी भातगिरणीचे काम बघुन शेकापक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस आमदार जयंत पाटील व शेकापक्षाचे जेष्ठ नेते कार्यसम्राट मा.आमदार विवेक पाटील, आमदार बाळाराम पाटील, आदर्श नगराध्यक्ष जे एम म्हात्रे , शेकापक्षाचे जेष्ठ नेते व मा.तालुका चिटणीस नारायणशेठ घरत , मा.सभापती काशीनाथ पाटीलविरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शेकापक्षाचे पमपा जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडु, शेकापक्षाचे तालुका चिटणीस मा.उपसभापती राजेश केणी यांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. तसेच संपूर्ण पनवेल तालुक्यातुन सर्व सामान्य शेतकरी व त्यांचे कुटुंबीय तसेच शेकापक्षाचे सर्व नेतेमंडळी पदाधिकारी संघटनेचे कार्यकर्ते यांनी सुद्धा संपूर्ण संचालक मंडळाचे कौतुक केले आहे.

# पेण तालुक्यात बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पेण**

विश्व शांतीचे प्रतीक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पेण तालुक्यातील विविध ठिकाणच्या बुध्द विहारात उत्साहात साजरी करण्यात आली.

जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने संपूर्ण जग याचा सामना मागिल दोन वर्षांपासून करीत आहे. त्यामुळे कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्य सरकारने लॉकडाऊन केले असून निर्बंध जारी केले आहेत.मात्र शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून तालुक्यातील अंतोरे बुद्ध विहारात लहान मुलांनी सकाळी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त बुद्धवंदना, पुजा पाठ घेऊन नविन आर्दश डोळ्यासमोर ठेवला आहे.यावेळी मुलांनी तोंडाला मास्क, सॅनिटायझर तसेच सोशल डिस्टन्सचेंही पालन केले.शहरातील बुद्ध विहारासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी हमरापूर, दुष्मी, कुरनाड, पाबळ, शिहु बेणसे , आदि गावांमध्ये तर काही नागरीकांनी आपल्या घरी सुद्धा बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी केली.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## राज्य उत्पादन शुल्क विभागाचा बडगा

असल्याची खबर मिळताच मंगळवारी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने पाळत ठेवून गोवा राज्यात निर्मिती व विक्रीसाठी असलेल्या भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याचे ६३५ खोके असलेला ट्रक पकडला. ब्लेंडर्स प्राईड, रॉयल चॅलेंजर्स, अरोबेला व्होडका, इम्पिरियल ब्लू व्हिस्की या ब्रँडच्या ७५० मि.ली.वजनाच्या बाटल्यांचे ५२५ खोके तर बडवायझर बियरचे अर्धा लीटर वजनाच्या टीनचे १०० खोके असे एकूण ६२५ खोके ट्रकसह भरारी पथकाने जप्त केले आहेत. ट्रकसह या मद्याची एकूण किंमत ६७ लाख ५७ हजार ७४० रुपये असून याप्रकरणी एकास अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळवले आहे. गेल्या सहा दिवसांपूर्वीच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पनवेल येथे गोवा राज्यातील अवैध मद्याचे ५६ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ५०० खोके तर २० मे रोजी उस्मानाबाद येथेही ४३ लाख ९३ हजार रुपये किमतीचे अवैध मद्याचे ५७५ खोक्यांसह मुद्देमाल या पथकाने जप्त केला आहे.

## दि.बा.पाटील यांचेच नाव विमानतळाला दिले पाहिजे : प्रितम म्हात्रे

घेतली असती. आज ठाणे, नवी मुंबई, रायगड येथील शेतकर्यांच्या जमिनी सिडको आस्थापनाने संपादित केल्यानंतर शेतकर्यांना भूमिपुत्रांना आणि प्रकल्पग्रस्तांना त्याचा योग्य मोबदला मिळवून देण्याचे अतुलनीय कार्य लोकनेते दि बा पाटील साहेब यांनी केले आहे. त्यांच्यामुळेच १२.५% विकसित भूखंड परतावा देण्याचे तत्व मंजूर झाले. शेतकरी मजूर कष्टकरी कामगार अशा श्रमजिवी घटकाला देखील सक्षम बनविण्यासाठी डी बा पाटील यांनी केलेले कार्य अफाट आहे. त्यामुळे दि बा पाटील यांचेच नाव विमानतळाला देणे योग्य होईल. शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत महाविकासआघाडी मधील नगरसेवक येणार्या महासभेमध्ये नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव दिले पाहिजे असा प्रस्ताव ठेवणार आहेत. दि.बा.पाटील साहेबांनी उदरनिर्वाहाचे साधन गमावलेल्या शेतकर्यांना जमिनीचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी संघर्ष केला,त्याची दखल तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घेतली म्हणूनच साडेबारा टक्के परतावा चे तत्व कायद्यात रूपांतरित होऊन संपूर्ण देशातील शेतकर्यांना त्याचा लाभ झाला आहे.

## विशेष रुग्णालयासाठी आरोग्यमंत्री राजेश टोपे सकारात्मक : ना.आदिती तटकरे

रुग्णक्षमतेच्या उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर होणे, ही काळाची गरज आहे. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्णयानुसार नवीन लेवल-३ ट्रॉमा केअर युनिटसाठी जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय (१०० बेड) व लेवल-३ ट्रॉमा केअर युनिट च्या दोन युनिटमध्ये १०० ते २०० कि.मी. अंतर असावे असे निकष आहेत. शासनाने निश्चित केलेले निकष विचारात घेऊन पनवेल ते माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे अंतर सुमारे १०० कि.मी.हून अधिक असून त्या ठिकाणी १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित आहे. त्यानुषंगाने मुंबई-गोवा महामार्गवरील माणगाव उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांच्या सोईसाठी लेवल-३ ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. महाड येथील ग्रामीण रुग्णालयास संलग्नतेने कार्यरत असलेले ट्रॉमा केअर युनिटसह ग्रामीण रुग्णालयाचे १०० रुग्णक्षमता असलेल्या उपजिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवर्धन करण्यात येईल. आरोग्य संस्थांचे विकेंद्रीकरण, भौगोलिक परिस्थिती, वाढते औद्योगिकरण व नागरीकरण विचारात घेऊन रोहा व लगतच्या परिसरामध्ये आरोग्य सुविधा वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्यातील मौजे भुवनेश्वर, ता. रोहा येथे सुमारे ५ एकर शासकीय जागेवर स्त्री व नवजात बाल रुग्णालय स्थापण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. रायगड जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक वैद्यकीय आरोग्य सोयीसुविधा निर्माण करण्याबाबत आरोग्यमंत्री श्री.राजेश टोपे नेहमीच सकारात्मक असतात, असे सांगून पालकमंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, कोविड-१९ मुळे ऐरणीवर आलेल्या आरोग्य सुविधेचा प्रश्न सोडविण्यासाठी शासकीय वैद्यकीय सुविधा बळकटीकरणासाठी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, ग्रामिण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा सामान्य रुगालय, यांना अत्याधुनिक आरोग्य सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची क्षमता वाढविण्यासाठी त्या सर्व स्तरांवर प्रयत्नशील आहेत.

## त्रिकुटास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले गजाआड

ट्रेन शी समांतर असल्याचे आढळून आले. अपर पोलीस आयुक्त गुन्हे यांचे मार्गदर्शन व प्रयत्नाने युपी जीआरपीएफ यांच्याशी सतत संपर्क ठेवून पाटलीपुत्र व वाराणसी एक्सप्रेस या दोन्ही ट्रेन जीआरपीएफच्या मदतीने सतना व प्रयागराज या ठिकाणी चेक करून आरोपीचा शोध घेतला तसेच वाराणसी रेल्वे स्टेशन येथेही तेथील जीआरपीएफ यांच्या मार्फत आरोपीचा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाहीत. तरीही तिन्ही आरोपीचा सतत माघ घेऊन ते उत्तर प्रदेश येथील जिल्हा भदोई, चौरी, या गावी पोहचताच तेथील मुखीया व पोलीस यांच्याशी सपंर्क करून तिन्ही आरोपी ट्रेस करून त्यांना चौरी पोलीस ठाणे यांच्या मार्फत आरोपी रोशन गटुर कुमार (२० रा.आदई गाव), सहमत आमरु अन्सारी (२२ रा.कामोठे), शहनवाज मोहम्मद शेख उर्फ शानू (३५, रा.नवीन पनवेल) ताब्यात घेतले. यातील आरोपी शहानवाज उर्फ शानू, हा अभिलेखा वरील गुन्हेगार आहे. त्यानंतर गुन्हे शाखा कक्ष २ चे व खांदेश्वर पोलीस ठाण्याचे संयुक्तिक पथक उ.प्र. येथे पाठवून नमूद आरोपींना ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. या आरोपींना अटक करण्यामध्ये सपोनि गणेश कराड, सपोनि प्रवीण फडतरे, पोउपनी मानसिंग पाटील, पोउपनी वैभव रोंगे, पो हवा सुनील कुदळे, पोशी अजिनाथ फुंदे व पथकाने विशेष मेहनत घेतली.

# खांदा कॉलनीतील बुद्धविहारात तथागत गौतम बुद्धाची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनीतील बुद्धविहारात तथागत गौतम बुद्धाची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली सर्वप्रथम बौद्ध उपासिका सरला शरद जाधव यांच्या शुभहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच निर्मला तायडे यांच्या हस्ते तथागताला पुष्प अर्पण करण्यात आले.

प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन चंद्रसेन कांबळे यांनी केले ते म्हणाले की प्रत्येक प्रत्येक बौद्ध उपासकाने पंचशील व २२ प्रतिज्ञा चे पालन करावे प्रत्येक रविवारी न विसरता सर्वांनी बुद्ध विहारात येण्याची कृपा करावी त्यातून आपल्याला धम्माचे ज्ञान मिळते असे सांगितले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिनेश जाधव होते सामुदायिक वंदना भारतीय बौद्ध महासभा यांनी घेतली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डीजे जाधव विश्वास भालेराव शामराव तोरणे राजू इंगळे यांनी मेहनत घेतली भगवान कदम अंकुश वाघमारे राजेंद्र बावस्कर पुंजाजी तायडे पंचशीला भद्रे इत्यादीने आपले मनोगत व्यक्त केले.

# बनावट कागदपत्रांचा वापर करून जप्त केलेल्या कारची विक्री, आरटीओ अधिकाऱ्यांसह १२ जणांविरोधात गुन्हा

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कर्जाचे हप्ते थकल्याने जप्त केलेल्या कारची परस्पर विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.



याप्रकरणी तत्कालीन आरटीओ अधिकाऱ्यांसह कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेड व रिलायन्स जनरल इन्शुरन्स ठाणे शाखेचे अधिकारी, अशा बारा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात खोटी तक्रार देऊन एपीएमसी पोलिसांचीदेखील फसवणूक करण्यात आली आहे.

वाशी आरटीओचे तत्कालीन अधिकारी दशरथ वाघुले, राजेंद्र सावंत यांच्यासह कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेड व रिलायन्स जनरल इन्शुरन्स ठाणे शाखेचे अधिकारी, अशा १२ जणांविरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी संगनमत करून जप्तीतल्या कारची परस्पर विक्री केल्याचा आरोप सीवूड येथील बाळासाहेब चलर यांनी केला आहे. चलर यांनी २०१३ मध्ये २६ लाखांची कार खरेदी केली होती. त्यासाठी एचडीएफसीमधून २२ लाखांचे कर्ज काढले होते. काही महिन्यांतच हे कर्ज त्यांनी कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडमध्ये वर्ग केले होते. २०१६ मध्ये व्यवसायातील तोट्यामुळे त्यांचे काही हप्ते थकले होते. त्यामुळे कोटक महिंद्राच्या रिकव्हरी एजंटने कोणतीही पूर्वसूचना न देता कार जप्त केली. त्यानंतर एक महिन्याने त्यांना ७ लाख ६६ हजार भरून कार घेऊन जाण्यास सांगण्यात आले. शिवाय तडजोड करून त्यांना ४ लाख २५ हजार भरण्यास सांगण्यात आले. यानुसार पुढील काही महिन्यात चलर यांनी पूर्ण रक्कम भरूनदेखील त्यांना कारचा ताबा देण्यास टाळाटाळ सुरू होती. अखेर त्यांनी वाशी आरटीओमध्ये चौकशी केली असता त्यांच्या कारचा बाजारभाव १८ लाख असतानाही १२ लाखाला विकली असल्याचे समोर आले. यामुळे त्यांनी सदर कार ट्रान्सफर होऊ नये यासाठी आरटीओला पत्र दिले. त्यानंतरही सदर कार विजय गारोडकर याच्या नावे ट्रान्सफर करण्यात आली. त्यासाठी कोटक महिंद्रा यांच्याकडून आरटीओकडे कोरी एनओसी जमा करण्यात आली होती; परंतु गाडीची मूळ कागदपत्रे चलर यांच्याकडेच असताना गाडी दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर कशी ट्रान्सफर झाली याबाबत आरटीओकडे चौकशी करूनही त्यांना प्रतिसाद मिळत नव्हता.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# मरावे परी देहरुपी उरावे..! अवयवदान करा.. अवयवदान करा..!

**अवयवदान म्हणजे काय?**

जिवंतपणी अथवा मृत झाल्यानंतर आपले अवयव दुसऱ्या व्यक्तीला देणे म्हणजे अवयवदान होय. अवयवदान श्रेष्ठदान असून ज्याद्वारे आपण मृत्यूनंतर आपले अवयवदान करून अंतिम स्वरूपी ज्यांचे अवयव निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकतो. ज्या रुग्णांचे अवयव कायमस्वरूपी निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांसाठी अवयवदान हाच एक आशेचा किरण आहे.

**अवयवदान प्रत्यारोपण प्रतिरूप म्हणजे काय?**

मानवी अवयव प्रत्यारोपण म्हणजे आधुनिक वैद्यकीय शास्त्राची एक मोठी उपलब्धी आहे. या उपचारात एखाद्या जिवंत वा मृत व्यक्तीचा अवयव अथवा अवयवाचा काही भाग शस्त्रक्रियेद्वारे विलग करून तो एखाद्या गरजवंत रुग्णांमध्ये प्रत्यारोपित करतात. ज्यांचा एखादा अवयव कायमस्वरूपी निकामी झाला आहे, अशा रुग्णांसाठी ही प्रमाणित व उपलब्ध अशी उपचार पद्धती आहे.

**आपण कोणत्या अवयवांचे दान करू शकतो?**

मेंदू स्तंभ मृत्यू (Brain Death)– मृत व्यक्तीची हृदयक्रिया चालू आहे पण तिचा मृत्यू झाला आहे, अशी व्यक्ती बहुतेक प्रमुख अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, हृदय, आतडी, डोळे, त्वचा, हृदयाची झडप आणि कानाचे डम यांचेदेखील दान करू शकते. सामान्य मृत्यू (Normal Death)– मृत व्यक्तीची जिची हृदयक्रिया बंद पडली आहे, अशी व्यक्ती फक्त डोळे व त्वचा या अवयवांचे दान करू शकते. जिवंत व्यक्ती (Live Donor)– जिवंत व्यक्ती फक्त आपल्या जवळच्या नातेवाईकांसाठीच अवयवदान करू शकते. रुग्ण दात्याचे जवळचे नातेवाईक म्हणजे आजी, आजोबा, नातू, मुलगी, मुलगा, आई–वडील, भाऊ–बहीण अथवा पती किंवा पत्नी हे असावे लागतात. या व्यतिरिक्त कोणालाही रुग्णासाठी अवयवदान करायचे असल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते. शासन रुग्ण व दाता यामध्ये काही आर्थिक देवाण–घेवाण नसून फक्त प्रेम व स्नेह या नात्यानेच अवयवदान होत आहे,याची खात्री झाल्यावरच परवानगी देते. जिवंत व्यक्ती फक्त काही मर्यादित अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड अथवा यकृताचा काही भाग दान करू शकतो.

**मस्तिष्क मृत्यू म्हणजे काय?**

वैद्यकीय शास्त्रानुसार एखाद्या व्यक्तीची चेतना व श्वासोच्छवास कायमस्वरूपी बंद झाल्यास त्याला मृत घोषित करता येते. या दोन्हीचे केंद्र आपल्या मेंदूतील मस्तिष्क स्तंभ या भागात असतो. अपघातात डोक्याला मार लागल्यास मेंदूत रक्तस्राव झाल्याने अथवा मेंदूच्या शस्त्रक्रियेनंतर मस्तिष्क स्तंभास कायमस्वरूपी इजा झाल्यास या व्यक्तीचा मस्तिष्क स्तंभ मृत्यू होऊ शकतो. एखाद्या व्यक्तीचे अतिदक्षता विभागात उपकरणांच्या सहाय्याने हृदय कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवले असेल तसेच काही ठराविक प्रमाणात चाचण्यांच्या आधारे तिचा मस्तिष्क स्तंभ मृत झाल्याचे निश्चित झाले तर त्या व्यक्तीस मृत घोषित करता येते. अशा व्यक्तीचे हृदय जास्तीत जास्त १६ ते ७२ तासापर्यंत कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवता येते व याच कालावधीत प्रमुख अंतर्गत अवयवांचे दान होऊ शकते. यासाठी त्या रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक असते. असे अवयवदान फक्त शासनाने प्रतिरोपणासाठी मान्यता दिलेल्या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात मस्तिष्क स्तंभ मृत्यू झाल्यासच असू शकतो.

**मस्तिष्क स्तंभ मृत्त अथवा ब्रेन डेड व्यक्ती जगण्याची काही शक्यता असते का? नाही.**

एखाद्या व्यक्तीस मस्तिष्क स्तंभ मृत्यू अथवा ब्रेन डेड घोषित केले असेल तर ती व्यक्ती जगण्याची शक्यता अजिबात नसते व ती व्यक्ती मृत असते. मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती व कोमातील रुग्ण यामध्ये फरक आहे. कोमातील रुग्ण मृत नसतात व ते परत जगण्याची शक्यता असते. तसेच मस्तिष्क स्तंभ मृत घोषित करणे म्हणजे इच्छामरण असे बिलकुल नाही. मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती ही मृत असते.

**अवयवदान करायचे असल्यास मृत्यू हा रुग्णालयात येणे गरजेचे आहे का? होय.**

मस्तिष्क स्तंभ मृत्यू हा प्रतिरोपणासाठी मान्यता असलेल्या रुग्णालयातच घोषित करता येत असल्याने अशा रुग्णालयातील अतिदक्षता विभागातच मृत्यू झाल्यास अवयवांचे दान होऊ शकते. परंतु डोळे व त्वचा यांचे दान मृत्यूनंतर सहा तासापर्यंत घरी मृत्यू झाला असेल तरी होऊ शकते.

**मस्तिष्क स्तंभ मृत्यू घोषित करणे व अवयवदान कायदेशीर आहे का? होय.**

भारतामध्ये मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ नुसार नुसार मस्तिष्क स्तंभ मृत्यू व अवयवदान या दोन्हींना मान्यता दिली आहे. या कायद्याची खालील विशेष उद्दिष्टे आहेत– मस्तिष्क स्तंभ मृत्यूला मान्यता देणे जेणेकरून मृत्यूनंतर अवयवदान होऊ शकेल. रुग्णांच्या उपचारासाठी मृत व्यक्तीचे अवयव काढणे, साठविणे व प्रतिरोपण करणे,यावर नियंत्रण ठेवणे. मानवी अवयवांच्या व्यापारावर प्रतिबंध घालणे, कायद्याने अवयव विकणे व विकत घेणे व त्यासाठी जाहिरात करणे किंवा अवयव मिळवून देण्यासाठी व्यापारी तत्त्वावर मध्यस्थी करणे, यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

**अवयवदानानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे शरीर त्यांच्या नातेवाईकांना परत दिले जाते का? होय.**

मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे अवयव काढल्यानंतर त्यांचे शरीर सन्मानपूर्वक त्यांच्या नातेवाईकांना अंत्यविधीसाठी परत दिले जाते. अवयवदान व देहदान या दोन्हीमध्ये फरक आहे. देहदानामध्ये मृताचे शरीर वैद्यकीय प्रशिक्षणासाठी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ठेवून घेतले जाते तर अवयवदानमधील अवयव प्रत्यारोपणासाठी वापरले जातात व शरीर नातेवाईकांना परत केले जाते.

**दान केलेल्या अवयवांचे वितरण कसे होते, ते फक्त श्रीमंत व्यक्तींनाच दिले जातात का? नाही.**

गरजू रूग्णांचे वय, रक्तगट त्यांच्या आजाराची तीव्रता, ते किती दिवस अवयवांची प्रतिक्षा करीत आहेत, त्यांची वैद्यकीय गरज या सर्वांसाठी प्रत्येक रुग्णास गुण दिले जातात. या सर्व गरजू रूग्णांची एक सामायिक प्रतिक्षा यादी केली जाते व सर्वाधिक गरजू रुग्णास अवयव दिला जातो. रुग्णांची आर्थिक स्थिती, त्यांची जात व धर्म, याची प्रतिक्षा यादीत त्यांचे स्थान ठरविताना काही संबंध नसतो. अवयवांचे वितरण हे महाराष्ट्र शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती यांच्यामार्फत पारदर्शकपणे होते.

**मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या नातेवाईकांना अवयव कोणाला दिले आहेत हे कळू शकते का? नाही.**

नातेवाईकांना अवयव मिळालेल्या रुग्णाचे नाव व पत्ता सांगितला जात नाही.

**अवयवदान केल्याने मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या शरी–रावर काही विद्रूपता येते का? नाही.**

मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्यास ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन त्याचे अवयव काळजीपूर्वक काढले जातात व शरीरावर विद्रूपता येत नाही. एखाद्या व्यक्तीची शस्त्रक्रिया जितक्या काळजीपूर्वकरित्या केली जाते, तितक्याच काळजीपूर्वकरित्या मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्याचे अवयव काढले जातात, जखम पुन्हा शिवली जाते. शरीरावर, पोटावर अथवा छातीवर शस्त्रक्रिया केल्याचे टाके मात्र राहतात.

**अवयवदानाला धर्माची परवानगी आहे का? होय.**

भारतातील सर्व धर्मांनी अवयवदानाला पाठिंबा दिला आहे व अवयवदान हे एक पुण्याचे काम मानले आहे.

**अवयवदान केल्यानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला काही मोबदला दिला जातो का? नाही.**

अवयवदानासाठी मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाचा मोबदला दिला जात नाही. म्हणून अवयवदान हे शुद्ध व श्रेष्ठ ठरते. परंतु अवयवदानाला संमती दिल्यानंतर अवयवदानासाठी करण्यात येणाऱ्या चाचण्यांचा तसेच इतर काही वैद्यकीय खर्च मृतांच्या नातेवाईकांना करावा लागत नाही.

**अवयवदान करायची इच्छा असल्यास काय करावे?**

एखाद्या व्यक्तीस मृत्यूनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याची इच्छा असल्यास त्यांनी कायद्यानुसार संमतीपत्र भरणे आवश्यक आहे. संमतीपत्रावर एखाद्या जवळच्या सज्ञान नातेवाईकांची सही घेणे देखील आवश्यक आहे. असा फॉर्म भरल्यानंतर त्या व्यक्तीस डोनर कार्ड दिले जाईल. हे कार्ड दात्याने सतत आपल्याजवळ बाळगावे. जेणेकरून त्यांच्या नातेवाईकांना अथवा मित्रपरिवाराला त्याच्या अवयवदान करण्याच्या इच्छेविषयी माहिती होईल. जरी आपण डोनर कार्डवर सही केली असली तरी आपल्या मृत्यूनंतर आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या संमतीशिवाय अवयवदान होवू शकत नाही, म्हणून आपल्या अवयवदानाच्या इच्छेविषयी नातेवाईकांना माहिती असणे आवश्यक आहे.

अवयवदानाविषयीची अधिक विस्तृत माहिती www.dmer.org, www.notto.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेच. त्याशिवाय डोनर कार्ड व अवयवदानासंबंधी माहिती देण्यासाठी विभागीय स्तरावर मुंबई येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, एल.टी.एम.जी. हॉस्पिटल (सायन हॉस्पिटल) कॉलेज बिल्डिंग, दुसरा मजला, औषध भांडाराच्या बाजूला, सायन (पश्चिम) मुंबई–२२, (www.ztccmumbai.org), विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, पुणे द्वारा के.ई.एम. हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे–१, (www.ztc-cpune.org), विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, औरंगाबाद, नॅफ्रॉलॉजी विभाग, एम.जी.एम.मेडिकल कॉलेज, एन–६, सिडको, औरंगाबाद ४३१००३, विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती,नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मानेवाडा, नागपूर–४४०००३ येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती कार्यरत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार माधव संताजी अटकोरे (मो.८०८७५६५१७२) यांनी या विषयावर अवयवदान: पार्थिवाचे देणे या पुस्तकातून अनेक मान्यवरांचे अनुभव आणि कर्तृत्व अतिशय समर्पक शब्दात गुंफले आहे. या लेखाद्वारे आपल्याला अवयवदान या विषयाबाबत आवश्यक ती माहिती मिळालेली असेलच, तर मग चला अवयवदानाचा संकल्प करु या.. अन् मरणानंतरही आपले जीवन सार्थकी लावू या..!

कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी रचलेल्या कवितेतील पुढील ओळी जीवनाचा अर्थ सांगणारी स्त्रोत ठरली आहे!

आयुष्य हे विधात्याच्या वहीतलं पान असतं
रिकामं तर रिकामं, लिहिलं तर छान असतं
शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं
मधली पान आपणचं भरायची असतात
तेच आपलं कर्म असतं!

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**रायगड–अलिबाग**

## महादेव वाघमारे यांचा शेकापमध्ये प्रवेश; पनवेल जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सामाजिक कार्यकर्ते व परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी कार्यकर्त्यांसह आमदार बाळाराम पाटील, महानगरपालिका विरा–धीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू यांच्या उपस्थितीत शेकतरी कामगार पक्षात प्रवेश केला. यावेळी आमदार भाई बाळाराम पाटील यांनी महादेव वाघमारे यांची शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल शहर व जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड केल्याचे जाहीर केले व निवडीचे पत्र वाघमारे यांना दिले.

यावेळी बोलताना आ.बाळाराम पाटील म्हणाले की, मागील दहा वर्षांपासून महादेव वाघमारे हे पनवेल व खांदा कॉलनीतील विविध प्रश्नांवर लढत आहेत, आणि जनतेची कामे करण्यासाठी प्रशासनाला भाग पाडत आहेत. त्यांच्या या कार्याचा आमच्या पक्षाला नक्की फायदा होईल. अशा सक्रिय धडाडीच्या कार्यकर्त्याची पनवेल शेकापला आवश्यकता होती ती वाघमारे यांच्या प्रवेशाने पूर्ण झाली आहे. शेकाप पक्षाच्या वतीने कामासाठी महादेव वाघमारे यांना सर्व प्रकारची पूर्ण ताकत दिली जाईल. यावेळी बोलताना वाघमारे म्हणाले की, मागील दहा वर्षांपासून मी कामगारांच्या आणि जनतेच्या प्रश्नांवर लढतोय पण आता शेतकरी कामगार पक्ष या पुरोगामी पक्षाच्या माध्यमातून त्या लढ्याला अधिक बळ मिळेल.

आता जनतेच्या प्रश्नांचा लढा अधिक बळकट करू, आता पन–वेल महानगरपालिकेत कामगारांचे प्रश्न, कचरा प्रश्न सोडवू व जनतेला न्याय देण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून अहोरात्र लढा देऊ. यावेळी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे,नगरसेवक गणेश कडू,विष्णू जोशी,शंकर म्हात्रे, श्याम लगाडे, गोपाळ भगत,जेष्ठ पदाधिकारी शिवाजी थोरवे,विजय काळे,गणेश पाटील आदींची भाषणे झाली. या कार्यक्रमास डॉ बाबासाहेब आंबेडकर मंडळ चे श्याम लगाडे, महेंद्र कांबळे, संदीप भालेराव, मुकुंद रोटे, सुभाष गायकवाड, तक्षशिला बुद्धविहार चे अध्यक्ष सुभाष धोत्रे व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कोरोना लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टनसिंगचे सर्व नियम पाळून हा कार्यक्रम शेकाप कार्यालयात साधेपणे उत्साहात संपन्न झाला. लवकरच लॉकडाऊन संपल्यानंतर कार्यकर्ता प्रवेश मेळाव्याचा भव्य जाहीर कार्यक्रम होणार घेणार आहे असे शेवटी वाघमारे यांनी सांगितले.

## कारचा अपहार ; गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कार भाड्याने उत्तर प्रदेशला घेऊन जातो आणि दोन दिवसात परत येतो असे सांगून कार चालकाने कार परत न करता तिचा अपहार केला आहे. कार चालक पवन कुमार कलेश्वर महतो याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल, साईनगर येथे राहणारे निखिल प्रकाश राणे यांनी जानेवारी २०१९ मध्ये फळभाज्यांचा धंदा सुरू केल्याने त्यांच्या कारवर त्यांना कार चालकाची गरज होती. त्यामुळे जानेवारी २०२१ मध्ये त्यांनी उबेर प वरून ऑनलाईन कार चालक हायर केला. पवनकुमार महतो (२८ राहणार वरळी मुंबई) याने तीन महिने चांगल्या प्रकारे धंदा करून मिळालेल्या नफ्याच्या पन्नास टक्के रक्कम निखिल राणे यांना दिली. एप्रिल महिन्यात पवन कुमार याने उत्तर प्रदेशचे भाडे घेऊन चाललो आहे असे सांगितले. यावेळी राणे यांनी ते भाडे परवडत नाही, तू माघारी ये असे सांगितले. मात्र पवन कुमार याने भाड्याचे ड्व्हान्स पंधरा हजार रुपये घेऊन कारमध्ये पेट्रोल आणि सीएनजी टाकलेले असल्याचे सांगितले.

त्यामुळे तो उत्तर प्रदेशचे भाडे घेऊन गेला. यावेळी दोन दिवसात परत मुंबईला येतो असे फोनवर त्याने सांगितले. ४ मे रोजी कारला लावलेले लॉजिकल प्स कंपनीचे जीप–ीएस कार चालकाने बंद केले. यावेळी फोन करून पवन कुमार यांना विचारणा केली असता वारंवार दोन दिवसात येतो असे उत्तर त्याने दिले. मात्र तो कार घेऊन मुंबईला आलेला नाही. त्यामुळे चार लाख रुपये किमतीच्या एमएच ४६ बीएम २४ ९२ या क्रमांकाच्या कारचा अपहार केल्याचा गुन्हा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला.

## इंडिया टिव्ही मार्फत नांदगाव मंडळ सजातील आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर गोरगरिबांना मदतीचा हात देण्यासाठी विविध सामाजिक संघटना पुढे येत असून त्याचाच भाग इंडिया टिव्ही मार्फत ॲड.विपिनकुमार जैन यांच्या प्रयत्नांतून नांदगाव मंडळ सजातील गावातील आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे नुकतेच वाटप करण्यात आले.



नांदगाव मंडळ सजातील नांदगाव नागेश्वर नगर, आडी, दांडे तर्फे नांदगाव, विहूर, मजगांव –आरावघर, उसरोली सुमरादेवी, बेलीवाडी, वावे, वाळवंटी, मणेरपाडा, वडघर येथील आदिवासीवाडीवर ३५० आदिवासी बांधवांना इंडिया टिव्ही मार्फत धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच वैशाली पवार व मुरुड तहसील कार्यालयाचे नांदगाव मंडळ अधिकारी किरण जुईकर, तलाठी अरविंद देशमुख, राजेंद्र पाटील, वरदा मयेकर, संगीता भाटकर, कोतवाल नरोत्तम दाभणे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सेवा सप्ताहाचे आयोजन



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

नेहमीच गरीब व गरजूंना मदतीचा हात देणारे रायगडचे सुपुत्र लोकनेते मा खासदार रामशेठ ठाकूर यांचा दिनांक २ जून रोजी ७० वा वाढदिवस साजरा होणार आहे त्यानिमित्ताने सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त खारघर मधील प्रभाग ४ च्या नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी धन्य वाटपाचे आयोजन केले होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर अनेकांचे व्यवसाय, नोकरी, कामधंदे, रोजगार बंद असल्यामुळे बिकट परिस्थिती ओढवली आहे. ह्यातच एक मदतीचा हात म्हणून लोकनेते व सर्वांचे मार्गदर्शक रामशेठ ठाकूर ह्यांचा वाढदिवस हा समाज उपयोगी, लोकहितवादी कार्यक्रम राबवत साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज प्रभाग क्र.४ च्या नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी आपल्या प्रभागातील गरीब व गरजूंना मोफत अन्न धान्य वाटप करण्यात आले. सध्य स्थितीत अनेक दुकाने अथवा व्यवसाय बंद आहेत याची जाणीव ठेवत खारघर मधील लॉंड्री व्यावसायिकांचा उदरनिर्वाहाचा देखील प्रश्न त्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना भेडसावत होता ही बाब लक्षात घेत खारघर शहरा–तील सर्वच लॉंड्री व्यवसायिकांना देखील अन्न धान्यचे मोफत वाटप करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक रामजी बेरा, उपाध्यक्ष दिलीप जाधव, सरचिटणीस दिपक शिंदे, उद्योग आघाडीचे संयोजक राजेंद्र उर्फ मामा मांजरेकर, भरत कोंढाळकर, खारघर लॉंड्री असोसिएशनचे संस्थापक हनुमंत पवार, भाजपचे संदीप एकबोटे,शेखरसिंग चौव्हान, स्मिता आचार्य, अल्पना डे, मेघनाथ ठाकूर, पंढरीनाथ ठाकूर, विजय ठाकूर, संदीप कासार यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### सावधान नोटीस

तमाम लोकांस सावधान नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ह्या आमचे अशिल मे.रचना डेव्हलोपर्स तर्फे प्रो.प्रा.श्री. संजय रोचीराम दुल्हाणी यांनी श्री.रवींद्र गोपाळ साठे यांच्या सोबत विकसन करार व कुलमुखत्यार पत्र रजिस्टर्ड दस्त क्रं.पवल–१–१३३८४–२०१२ व पवल–१–९४८–२०१२ केलेले आहे. सदर जमीन मिळकत ही आमचे अशिल विकसित करणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे / कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| श्री.रवींद्र गोपाळ साठे | १६ | १ | भोगवटादार वर्ग–१ | ०–५४–० | १.७५ |

सबब सदर मिळकती संदर्भात कोणत्याही इसमांनी कोणत्याही प्रकारचा दस्त अथवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये त्यास आमचे अशिलांची तीव्र हरकत आहे व राहील.

तरी या सावधान नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदरील जमीन मिळकती संदर्भात कोणत्याही इसमांनी आमचया अशिलांच्या संमतीशिवाय कोणताही प्रकारचा दस्त, करार, अथवा व्यवहार करण्याचा प्रयत्न केला तर तो करार अथवा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, म्हणून सदरची सावधान नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे हे आपणांस कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/०५/२०२१

**सही/–**
**ॲड.सतिश स.फडके**
**बी–२, धवलगिरी को.ऑप.हौ.सो.लि.,**
**प्लॉट नं.१०४, पिसपार्क हॉटेलजवळ,**
**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.८८९८२१७५५५**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री.नाना सुदाम भोईर व इतर ३९ व श्री.बबन नारायण भोईर व इतर ४१, श्री.सचिन पंढरीनाथ भोईर उर्फ पाटील, श्री.नाथा सुदाम पाटील, श्री.अजित अनंता भोईर (पाटील) व श्री.भरत सुदाम भोईर, रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या सामाईक मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जात असलेली खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पडघे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पडघे ता.पनवेल | १२ | १ | ०–३२–०० पो.ख. ०–००–०० | १.३१ |
| पडघे ता.पनवेल | १५० | ० | ०–०५–३० पो.ख. ०–००–३० | १.०० |
| | | | एकूण ०–३७–६० | |

वर उल्लेख केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये कै.पद्मा वासुदेव पाटील, रा.मौजे तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे श्रीमती.भिमाबाई त्रिंबक राजे यांची कन्या या नात्याने वडिलोपार्जित वारसाहक्काने हक्क हितसंबंध प्राप्त झालेले आहेत. मात्र सदर शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा श्री.नाना बाबू भोईर व इतर ३९ व श्री.बबन नारायण भोईर व इतर ४१, श्री.सचिन पंढरीनाथ भोईर उर्फ पाटील, श्री.नाथा सुदाम पाटील, श्री.अजित अनंता भोईर (पाटील) व श्री.भरत सुदाम भोईर यांच्या नावावर असल्यामुळे तसेच त्यांच्या पुर्वगामीच्या नावावर असल्यामुळे या संधीचा गैरफायदा घेवून संबंधित व्यक्ती तिऱ्हाईत इसमांना करारनाम्याने विकण्याचे निश्चित केले आहे. असे खात्रीलायकरित्या समजलेले आहे. वर उल्लेख केलेल्या एकंदर २ शेतजमीन मिळकती विकण्याचा हक्क व अधिकार श्री.नाना बाबू भोईर व इतर ३९ व श्री.बबन नारायण भोईर व इतर ४१, श्री.सचिन पंढरीनाथ भोईर उर्फ पाटील, श्री.नाथा सुदाम पाटील, श्री.अजित अनंता भोईर (पाटील) व श्री.भरत सुदाम भोईर, यांना नाहीत. त्यामुळे संबंधितांसमवेत कोणीही जमीन खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करू नये.

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत कोणीही खरेदी–विक्रीचा व्यवहार करू नये, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.२५/०५/२०२१

**सही/–**
**ॲड.शिवराज गणपतराव राणे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**सावली, रो–हाऊस, प्लॉट–अे/२१,**
**सेक्टर ६, नवीन पनवेल–४१०२०६**
**मो.नं.९८६९२०५०१३**

# संक्षिप्त...

## मंगळसूत्र खेचून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पायी जात असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून तेथे आलेले दोघेजण पसार झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

मालती दुबे (५९) या सकाळच्या वेळी हिराई क्लिनिकच्या समोरील रस्त्यावरुन पायी जात असताना समोरुन चालत आलेल्या अनोळखी इसमाने त्यांच्या जवळ येवून त्यांच्या गळ्यातील जवळपास ३५ हजार रुपयाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून त्याच्या मित्राशी संगनमत करून ते दोघे पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोबाईल खेचून मोटार सायकलवरुन पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनोळखी इसमांनी एका इसमास आईला फोन दाखविण्याचा बहाणा करून त्याच्या हातातून मोबाईल फोन हिसकावून त्याला धक्का देवून मोटार सायकलवरुन पसार झाल्याची घटना खारघर जवळील खुटुकबंधन येथे घडली आहे.

फिर्यादी रजनीस चौरसिया याचा लहान भाऊ विकास याच्याकडे मोटार साायकलवरुन अनोळखी इसम येवून माझ्या आईला फोन दाखविण्याचा बहाणा करून त्याच्याजवळ असलेले जवळपास ३२ हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल फोन त्याच्याकडून हिसकावून घेवून त्याला धक्का देवून मोटार सायकलवरुन पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## चाकूने केले वार, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओवे पेठ येथील ६४ वर्षे इसमावर चाकूने वार केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर, ओवे पेठ येथील पंडित पदु कोळी हे घराची जागा स्वच्छ करत असताना त्यांच्या जुन्या घराच्या बाजूस राहणारा कमलाकर हिरा खांदेकर यांनी तू माझ्या जागेवर नवीन घर बांधायचे नाही असे म्हणून त्याच्या हातातील चाकूने डोक्यावर वार केले. आणि भावेश खांदेकर याने हाता बुक्याने मारहाण केली. कमलाकर आणि भावेश यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुधागड तालुक्यात बुधवारी १० कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात बुधवारी (ता.२६) १० कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ६ जणांनी कोरोनावर मात केली आहे. सध्या तालुक्यात कोरोनाचे १०१ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली. तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ११०० रुग्ण झाले असून ९४८ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ५१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

# महापौरांसमवेत सभागृहनेते व नगरसेवकांनी कोविड रुग्णालयांस दिल्या भेटी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथील कोविड समर्पित तसेच एमजीएम रुग्णालयास महापौर डॉ.कविता किशोर चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेटी देऊन सोयीसुविधांचा आढावा घेतला. तसेच भारतीय कपास निगमच्या गोडावून येथे होणाऱ्या प्रस्तावित जंबो कोविड सेंटरला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी स्थायी समिती सभापती संतोष जी. शेट्टी, महिला व बाल कल्याण सभापती मोनिका महानवर, प्रभाग ब सभापती समीर ठाकूर, प्रभाग क सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेविका दर्शना भोईर, उपआयुक्त संजय शिंदे, सहाय्यक आयुक्त वंदना



गुळवे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. भोईटे, डॉ. पंडित उपस्थित होते.

कोविडच्या दुसऱ्या लाटेमध्ये पनवेल महानगरपालिकेला सिडकोने कळंबोली येथे ७२ बेडचे कोविड समर्पित रुग्णालय उपलब्ध करून दिले आहे. या रुग्णालयाचा पनवेल कार्यक्षेत्रातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. या रुग्णालयांस आणि एमजीएम रुग्णालयास महापौर डॉ.कविता किशोर चौतमोल ,सभागृह नेते परेश ठाकूर व नगरसेवकांनी भेट देऊन तेथील डॉक्टरांकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती घेतली. त्याचबरोबर संभाव्य तिसरी लाट, म्युकर मायकोसिस याबद्दल माहीती घेतली. तसेच सिडको भारतीय कपास निगमच्या गोडावूनमध्ये महापालिकेला जंबो कोविड सेंटर उभा करून देणार आहे. या जंबो कोविड सेंटरच्या कामकाजाची पहाणी मान्यवरांनी केली.

# माथेरानमध्ये पावसाळी पूर्व कामांना वेग

## गटनेते प्रसाद सावंत यांची अभियंत्यांसोबत स्थळांना भेट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

आगामी काळात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर इथे मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असल्याने पावसाच्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा गटारांची साफसफाई कशाप्रकारे करण्यात आली आहे याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी नगरपरिषदेचे सभागृह गटनेते प्रसाद सावंत यांनी नगरपरिषदेच्या अभियंत्यांना सोबत घेऊन विविध ठिकाणांची पाहणी केली आहे.



ज्या ठिकाणी पावसाळी पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणावर आहे अशा ठिकाणी चांगल्या स्थितीत कामे पूर्ण करण्याबाबत प्रसाद सावंत यांनी संबंधीत अधिकारी वर्गाला सूचना केल्या आहेत. अद्यापही अनेक भागात ही कामे पूर्ण करण्यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून युद्धपातळीवर कामे सुरू असून माथेरानचा संपूर्ण भूभाग लाल दगडी मातीचा असल्याने रस्त्यांची धूप होणार नाही याची काळजी घेतली जात आहे.

सध्या पांडे रोड वरील गटारांची साफसफाईची कामे वेगाने सुरू असून लुईझा पॉइंट तसेच सनसेट पॉईंट येथे सुध्दा ही कामे पूर्ण केली जात आहेत. यावेळी प्रसाद सावंत यांच्या सोबत नगरपरिषदेचे अभियंते स्वागत बिरंबोळे, अभिमन्यू येळवंडे, नगरसेवक शकील पटेल, नरेश काळे, बनसोडे, राजेश काळे, अर्जुन पारधी, अन्सार महापुळे यासंह अन्य उपस्थित होते.

## दि.बा.पाटील प्रकल्पग्रस्त ठेकेदार संघटनेच्या मागणीला शासनाकडून मंजूरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दि बा पाटील प्रकल्प ग्रस्त ठेकेदार संघटनेच्या मागणीला आज मोठे यश मिळाले असून महाराष्ट्र शासनातर्फे ते करीत असलेल्या १० लाख रुपयाच्या कामाला मंजूरी देण्यात आले आहे व तशा आदेशाचे पत्र त्यांना देण्यात आले आहे.

सदर संघटना २०१२ पर्यंत एटू हे ५ लाखाचे होते. परंतु २०१२ नंतर हे एटू ३ लाखाचे करण्यात आले. त्यामुळे ठेकेदारचे खूप हाल झाले होते. ही कामे ठेकेदारांना परवडत नव्हती. त्यासाठी ही कामे तीन लाखा वरून दहा लाखाची करावी अशी मागणी दि बा पाटील ठेकेदार संघटने मार्फत शासनाकडे करण्यात आली होती. संघटनेचे अध्यक्ष शशिकांत डोंगरे, कार्याध्यक्ष त्रिंबक केणी, सल्लागार रविशेठ पाटील, चिटणीस राजेश गायकर, उपाध्यक्ष मोहन पाटील, मारुती पाटील, मोहन म्हात्रे, प्रमोद भगत, जीवन गायकवाड इत्यादींनी शासनाकडे पत्रव्यवहार करून यामागणी बाबात पाठपुरावा केला. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, मंत्री नाना पटोळे आदींनी त्यांच्या मागणीचा विचार करून एटू तीन लाख वरून दहा लाख करण्याची परवानगी दिल्याने या ठेकेदारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# धुतुमचे गावठाण विस्तार तातडीने करण्याची ग्रामपंचायतीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

मागील ७० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गावठाण विस्ताराचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशी मागणी धुतुम ग्रामपंचायतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. उरण तालुक्यातील धुतुम गाव फक्त दोन एकर क्षेत्रावर वसलेले आहे.नैसर्गिक लोकसंख्येच्या आधारावर दर १० वर्षांनी २०० मीटर क्षेत्राचा विस्तार शासनावर बंधनकारक आहे.

मात्र मागील ७० वर्षांपासून धुतुम गावाचा गावठाण विस्तारच झालेला नाही. त्यामुळे गरजेनुसार ग्रामपंचायतीने ६५ एकर क्षेत्रात शाळा, मैदाने, तलाव व ग्रामस्थांनी नैसर्गिक लोकसंख्या वाढीमुळे गरजेपोटी घरे बांधली आहेत. मागील ७० वर्षांपासून गावठाण विस्तारच झालाच नाही तर नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा प्रश्न आज पर्यंत तसाच पडून राहिला आहे. त्यामुळे ६५ एकर क्षेत्रातील विस्तारित गावठाणातील सिमांकित नकाशाला जिल्हाधिकारी, भुमिअभिलेख विभागाने मान्यता देण्याची विनंती धुतुम ग्रामपंचायतीच्या सरपंच शारदा ठाकूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रातुन केली आहे.

धुतुम ग्रामपंचायतीच्या हद्दीत शाळा, कॉलेज, क्रिडांगणे, दव-ाखाना, समाज मंदिर, मंदिर, मासळी मार्केट,बंदर, मासळी सुकविण्यासाठी आणि वाहने पार्किंगची जागा उप-लब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार ग्रामस्थांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने गावठाण विस्तार करुन देण्याची आवश्यकता आहे. यासाठी गावठाण विस्तार आणि ६५ एकर जागा ग्रामपंचायतीच्या नावे करण्याचीही मागणी सरपंच शारदा ठाकूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रातुन केली आहे.



# पेण तालुक्यातील ५० गावांचा पाणी प्रश्न वर्षभरात सुटणार

## हेटवणे धरणातून आणणार शहापाडा धरणात पाणी ; खा.सुनील तटकरे यांनी केली धरणाची पाहणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील गेली अनेक वर्ष रखडलेला पाणी प्रश्न येत्या वर्षभरात मार्गी लागणार आहे. यासाठी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी पुढाकार घेतला आहे. आज बुधवार (दि.२६ )मे रोजी शहापाडा धरण, वाशी, शिर्कि याठिकाणी खासदार सुनील तटकरे यांनी पाहणी केली. व संबंधित अधिकारी व ग्रामस्त यांच्याशी चर्चा विनिमय करून सर्वांच्या जिव्हाळ्याचा व अत्यंत महत्वपूर्ण असलेला पाणी प्रश्न लवकरच सोडविला जाईल असे अभिवचन यावेळी देण्यात आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेतून ३० कोटी खर्च करून हेटवणे धरणातून शहापाडा धरणात पाणी आणून ते खारेपाट गावातील ५० गावांना पाईपद्वारे पोहचविण्यात येणार आहे. त्यामुळे या गावांचा पाणी प्रश्न वर्षभरात संपणार असल्याचे खासदार सुनील वटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सदस्य सचिव किशोर राजे निंबाळकर, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता सुधीर वेंगुर्लेकर,राष्ट्रवादी काँग्रेस पेण तालुकाध्यक्ष दयानंद भगत, महिला तालुका अध्यक्ष चैताली पाटील, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, परशुराम मोकल ,प्रमोद मोरे, आदींसह सरपंच, अधिकारी, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. ग्रामस्थांनी आपल्या पाण्याच्या समस्यांचा पाढा खासदार सुनील तटकरे याच्या पुढे मांडला. पाण्याचा प्रश्न हा वर्षभरास सोडविला जाईल असे आश्वासन तटकरे यांनी यावेळी दिले आहे.

पेण विभागातील खारेपाट विभागाला पाणी पुरवठा करण्यासाठी ५५ वर्षापूर्वी शहापाडा येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत धरण बांधण्यात आले आहे. त्यानंतर हे धरण रायगड जिल्हा परिषदेकडे देण्यात आले. मात्र तरीही खारेपाट भागातील ५० गावे ही आजही पाण्यापासून वंचित राहिली आहेत. जानेवारी महिन्यापासून या गावात पाणी टंचाई समस्या सुरू होऊन टँकरद्वारे पणो पुरवठा केला जातो. त्यामुळे ही गावे आजही पाण्यापासून वंचित राहिली आहेत.

खारेपाट भागातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासोबत खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. य बैठकीत खारेपाट विभागातील पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी चर्चा झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत आता ३० कोटी खर्च करून हेटवणे धरणातून ९ दशलक्ष घन मीटर पाणी शहापाडा धरणात आणून सोडले जाणार आहे. शहापाडा धरणातून पाईपद्वारे हे पाणी ५० गावांना पुरविले जाणार आहे. यासाठी तातडीचा निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

## मारहाण प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रॉपर्टीच्या मिळकतीच्या वादाचा राग मनात धरून दोघांनी ३८ वर्षे इसमास मारहाण केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर, कोपरा येथील चंद्रकांत अनंत तोडेकर यांच्या वडिलांच्या बँक खात्यात भाड्याचे जमा होणारे पैसे त्यांचा मोठा भाऊ स्वतःच्या वैयक्तिक वापरासाठी वडिलांकडे मागत होता.

यावेळी त्याला विरोध केल्याने त्यांचा भाऊ व चंद्रकांत यांच्यात वाद होत असत. शशिकांत अनंत तोडेकर आणि त्यांचा मुलगा जयदीप शशिकांत तोडेकर हे बाहेर उभे असताना त्यांनी चंद्रकांत यांना शिवीगाळ करून हातांनी मारहाण केली.

त्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केले असता जयदीप यांनी रस्त्यावर सिमेंटचा पेवर ब्लॉक उचलून त्यांच्या पाठीत घातला यात चंद्रकांत हे बेशुद्ध पडले. त्यामुळे पोलिस ठाण्यात शशिकांत तोडेकर आणि जयदीप तोडेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कृषी विभागामार्फत रोहिणी नक्षत्रात विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

चालू वर्षी मान्सून हा वेळेवर येणार असून मे २५ तारखे पासून रोहिणी नक्षत्रास सुरुवात होत आहे . त्यामुळे माणगाव तालुक्यातील भात पिकाखालील बारा हजार हेक्टर क्षेत्र व नाचणी पिकाखाली दोन हजार हेक्टर क्षेत्र असून शेतकऱ्यांची बियाणे, खते, कीटकनाशके घेण्याची लगबग सुरू झाली आहे. माणगाव कृषी विभागामार्फत यावर्षी रोहिणी पंधरवड्याचा धरतीवर करोना प्रादुर्भावाची काळजी घेऊन, विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.



बियाणे उगवण क्षमता व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिके- यामध्ये प्रामुख्याने जे शेतकरी मागील दोन वर्षापूर्वी घरचे बियाणे पेरणीसाठी वापरतात त्यांना ३ टक्के मिठाच्या द्रावणाची बीजप्रक्रिया,नत्र स्थिर करणाऱ्या अझोटोबॅक्टर व पी एस बी यांची बीज प्रक्रियेबाबत गावोगावी प्रशिक्षण घेऊन मार्गदर्शन करण्यात येत आहे. खत बचत मोहीम - चालू वर्षी दहा टक्के खत बचत मोहिमेअंतर्गत तालुक्यातील शेतकऱ्यांना रोहिणी नक्षत्र मध्ये गावात लावलेल्या जमिन सुपीकता निर्देशांकाच्या आधारे खताचा वापर, हिरवळीच्या खताचा म्हणजे गिरीपुष्पच्या पाल्याचा वापर, युरिया खताचा विभागून वापर करणे इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. शेतीशाळा- चालू वर्षी २३ शेतकऱ्याची शेती शाळेमधून भात पिका बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. फळबाग लागवड- माणगाव तालुक्यामध्ये फळबागेचे क्षेत्र वाढत असून मागील वर्षी १२३ हेक्टर वरती फळबागेची लागवड करण्यात आली चालूही वर्षी फळपीक लागवडीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवड योजनेअंतर्गत ३०० हेक्टर क्षेत्रावर आंबा,काजू, नारळ इत्यादी फळपिकांची महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमधून लागवड करण्याबाबत नियोजन केले असून रोहिणी नक्षत्र मध्ये याबाबत प्रचार प्रसिद्धी व अर्ज घेण्यास सुरुवात करण्यात आले आहे. तरी शेतकऱ्यांनी सदर प्रशिक्षणाचा व योजनांचा लाभ घेण्यात यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव मार्फत करण्यात येत आहे.

# जांभूळपाडा अंबा नदीत शेकडो माशांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा अंबा नदीत बुधवारी (ता.२६) शेकडो माशांचा मृत्यू झाला आहे. कोणीतरी अज्ञ-ाताने मासेमारीसाठी विषारी द्रव टाकल्याने हे मासे मृत झाले आहेत.

तालुक्यासह जिल्ह्यात देखील काही ठिकाणी अशा प्रकारे विषारी द्रव्य टाकून मासेमारी केली जाते. यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. याबरोबरच येथील सजीव सृष्टीला देखील हानी पोहचते. शिवाय मानवी आरोग्यावर सुद्धा परिणाम होतो. जांभुळपाड्यातील ग्रामस्थ संदेश लोंढे यांनी सांगितले की गेली अनेक वर्षे तालुक्यात अंबा नदीमध्ये विषारी द्रव्य टाकून मासेमारी केली जात आहे. अशी मासेमारी थांबवून या लोकांवर कारवाई केली पाहिजे. तर उपसरपंच महेश गिरी म्हणाले की रात्रीच्यावेळी अंबा नदीमध्ये विषारी द्रव्य टाकून अज्ञाताने मासेमारी केली आहे. त्यामुळे येथील असंख्य मासे मृत पावले आहेत. त्यामुळे असे कोणी मासेमारी करणारे माहिती असल्यास ग्रामस्थांनी तात्काळ त्यांची माहिती ग्रामपंचायतीला द्यावी जेणेकरून त्यांच्यावर कारवाई करता येईल. असे आवाहन उपसरपंच महेश गिरी यांनी केले आहे.

